सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत अधिसूचित सेवांसंदर्भात शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (GPR) करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन निर्णय क्रमांक :- सीओएम-२०२४/प्र.क्र.२१/संगणक कक्ष
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ०४ नोव्हेंबर, २०२६.

वाचा :-

१) सार्वजनिक बांधकाम विभाग, अधिसूचना क्र. सी.ओ.एम. २०१५/प्र.क्र.२४/संगणक कक्ष, दि. ११ एप्रिल, २०२५.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण १७२५/प्र.क्र.१२६/मातं, दि.३०.०५.२०२५.
३) नियोजन विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२६/प्र.क्र.४७/का.१४११, दि. ०३ ऑगस्ट, २०२६.
४) मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील दिनांक ०९.१०.२०२६ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना :-

नागरीक तसेच उद्योग व्यवसायांना सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या विविध परवानग्या, ना-हरकत प्रमाणपत्रे (NOC), कंत्राटदार नोंदणी व इतर सेवा अधिक पारदर्शक, सुलभ, कालबद्ध, डिजिटलाइज्ड आणि गतिमान करण्यासाठी संदर्भ क्र. २ येथील शासन परिपत्रकान्वये निर्देशित केल्याप्रमाणे शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (Governance Process Re-engineering - GPR) राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संदर्भ क्र.१ अन्वये अधिसूचित सेवा खालीलप्रमाणे आहेत :-

१. रस्ता ओलांडून - समांतर जाणाऱ्या वाहिन्यांसाठी (ऑप्टीकल फायबर केबल, गॅस, पाणी पाईपलाईन ई.) ना-हरकत प्रमाणपत्र देणे.

२. उद्योग घटकांसाठी मूलभूत सुविधा जसे वीज, पाणी व सांडपाणी इ. जोडणी पुरविण्यासाठी रस्ता खोदणे, मुख्य रस्त्यांना जोड रस्ते इ. करिता ना-हरकत प्रमाणपत्र देणे.

३. पेट्रोलपंपाच्या पोहोच मार्गाचे ना-हरकत प्रमाणपत्र देणे.

४. रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतींना ना-हरकत प्रमाणपत्र देणे.

५. सा.बां. विभागांतर्गत असलेल्या रस्त्यांवरील खड्डे भरणे.

६. कंत्राटदार वर्ग-४ व ४अ यांची नोंदणी व नूतनीकरण..

७. कंत्राटदार, वर्ग ५, ५(अ), ६ याची नोंदणी व नूतनीकरण आणि बेरोजगार अभियंत्यांचे नोंदणीकरण व मजूर सहकारी संस्थावर्ग-अ यांचे वर्गीकरणे व नूतनीकरण.

८. कंत्राटदार वर्ग ७,८,९ आणि कामगार सहकारी संस्था, वर्ग-ब यांचे वर्गीकरण इमारत देखभाल व स्थापत्य अभियांत्रिकी मधील परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचे वर्ग-७ मध्ये नोंदणीकरण व नूतनीकरण.

संदर्भ क्र. ३ अन्वये गठीत करण्यात आलेल्या शासकीय प्रक्रिया पुनर्रचना मान्यता समितीने संदर्भ क्र. ४ अन्वये झालेल्या बैठकीत विभागाच्या ४ अधिसूचित सेवांचे सुसुत्रीकरण व GPR प्रारुपास मान्यता दिली आहे. वरील ८ सेवांपैकी ४ सेवा प्रशासकीय विलंब टाळण्यासाठी, अर्जातील कागदपत्रे व मंजुरीचे स्तर कमी करण्यासाठी तसेच 'आपले सरकार' व 'मैत्री' (Maitri) पोर्टलद्वारे पूर्णतः डिजिटल पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी सुधारित कार्यपद्धती लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

शासन निर्णय :-

सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत पुरविण्यात येणाऱ्या सेवांच्या सुसूत्रीकरणासाठी आणि कामकाजातील कार्यक्षमता वाढविण्यासाठी GPR प्रणाली अंतर्गत खालीलप्रमाणे सुधारित स्वरूपात सेवा प्रदान करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. सदर सेवांपैकी Government to Citizen (G2C) सेवा आपले सरकार पोर्टलव्दारे (https://aaplesarkar.maharashtra.gov.in) तर Government to Business (G2B) मैत्री पोर्टलव्दारे (https://maitri.maharashtra .gov.in) प्रदान करण्यात येणार आहेत.

१. सेवांचे सुसूत्रीकरण :-

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सेवा हमी कायद्यांतर्गत संदर्भ क्र. १ अन्वये अधिसुचित करण्यात आलेल्या सेवांचे सुसूत्रीकरण करून समान स्वरुपांच्या सेवांचे एकत्रिकरण, अनावश्यक सेवा वगळणे तसेच प्रक्रियांचे सुलभीकरण करुन अधिसुचित केलेल्या सेवांची संख्या ०८ वरुन ०६ इतकी सुधारित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

वरील सेवांपैकी समान स्वरुपाच्या अ.क्र. १ व २ येथील सेवांचे एकत्रीकरण (Merge) करून एकच सेवा तयार करण्यात येत आहे. अ.क्र. ५ वरील सेवा खड्डे तक्रार निवारण (Pothole Grievance) संबंधित असुन, ही 'सेवा' सदरात न येता तक्रार निवारण यामध्ये येत असल्याने सदर सेवा यादीतून वगळण्यात येत आहे. तथापि, रस्ते खड्डे संबंधीत तक्रारी व त्यांचे निवारण यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेतस्थळावरील "PCRS (Pothole Complaint Redressal System)" हे ॲप्लीकेशन या पुढेही कार्यरत राहणार आहे. उर्वरित कंत्राटदार नोंदणीबाबतच्या ३ सेवांबाबत स्वतंत्रपणे GPR कार्यवाही सुरु असून या ३ सेवा एकत्र करुन एकच सेवा राहील. GPR कार्यवाहीनुसार सुधारीत सेवा खालीलप्रमाणे असतील :-

१. पायाभूत सुविधांच्या सेवा पुरवण्याचा भाग म्हणून, रस्त्यावरून किंवा रस्त्याला समांतर अशा उपयुक्तता वाहिन्यांसाठी (utility channels) रस्ता खोदकामाबाबत 'ना-हरकत प्रमाणपत्र' देणे.
२. पेट्रोलपंपाच्या पोहोच मार्गाचे ना-हरकत प्रमाणपत्र देणे.
३. रस्त्याच्या कडेला असलेल्या इमारतींना ना-हरकत प्रमाणपत्र देणे.
४. कंत्राटदार /बेरोजगार अभियंत्यांचे /मजूर सहकारी संस्था/ कामगार सहकारी संस्था/ स्थापत्य अभियांत्रिकी मधील परीक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचे नोंदणी व नूतनीकरण..

२. मंजुरी प्रक्रियेतील स्तर/डेस्क संख्या कमी करणे व अधिकार प्रत्यार्पण :

- संदर्भ क्र. १ अन्वये अधिसुचित सेवांमधील सेवा अ.क्र. १, २, ३ व ४ मध्ये असलेले मंजुरीचे स्तर कमी करून कार्यकारी अभियंता स्तरावर आणण्यात येत आहे.
- तसेच, डिजिटल कार्यप्रवाहामुळे सर्व सेवांचा मंजुरी कालावधी विवरण पत्रात दिल्याप्रमाणे कमी करण्यात येत आहे.

३. कागदपत्रांची संख्या कमी करणे :

नागरीकांना सेवा सुलभतेने उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाच्या इतर प्रणालीमध्ये उपलब्ध असलेली अथवा विभागाकडे पूर्वीच उपलब्ध असलेली माहिती पुन्हा अर्जदाराकडून मागविण्यात येणार नाहीत. जसे की, इतर शासकीय प्रणालींमध्ये उपलब्ध असलेली माहिती Application Programming Interface (API) एकात्मिकरणाद्वारे प्रणालीतून थेट "ऑटो-फेच" पध्दतीने केली जाईल. कामाच्या

अचूकतेसाठी रेखांश-अक्षांश (Latitude-Longitude) चा वापर केला जाईल. क्षेत्रीय अभियंत्यांसोबतच्या संयुक्त पाहणीच्यावेळी भरुन घेण्यात येणाऱ्या प्रपत्राचे डिजिटलीकरण (Digitalisation) केले जाईल.

४. प्रतिज्ञापत्रांऐवजी स्वयंघोषणापत्र :

ज्या बाबींसाठी वैधानिक बंधनाची अट नाही, अशा बाबींसाठी प्रतिज्ञापत्रांऐवजी आधार क्रमांकाशी जोडलेल्या मोबाईलवर प्राप्त होणाऱ्या वन टाईम पासवर्ड (OTP) वर आधारीत स्वयंघोषणापत्र (Self-Declaration) घेण्यात येईल व ते कायदेशीररित्या वैध व मान्यताप्राप्त मानले जाईल, सदर इलेक्ट्रॉनिक संमती/ स्वयंघोषणापत्र हे स्वाक्षरीयुक्त प्रतिज्ञा समकक्ष समजण्यात येईल.

५. अंतिम प्रमाणपत्रे :

या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या शासन प्रक्रिया पुनर्रचनेनुसार सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ४ सेवांची ऑनलाईन प्रणाली सुधारित करण्यात येत असून सर्व डिजिटल स्वाक्षरीयुक्त अंतिम परवाने, प्रमाणपत्रे ऑनलाईन प्रणालीद्वारेच उपलब्ध केले जातील आणि सदर प्रमाणपत्रांवर सत्यप्रत तपासणीयोग्य Digital Verifiable Credentials (QR code, Bar Code, etc.) समाविष्ट असेल.

६. अपिलीय स्तर :

संदर्भ क्र १ अन्वये सेवा हमी कायद्याचा अनुषंगाने अपिलीय स्तर पूर्वीप्रमाणेच असतील.

७. प्रस्तुत शासन निर्णयातील सर्व अटी व सुधारित कार्यपद्धती ही महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ (MahalT) मार्फत संबंधित ऑनलाईन प्रणालीचा विकास (System Development) पूर्ण होऊन सदर सेवा प्रणालीवर गो-लाईव्ह (Go-Live) झाल्याच्या दिनांकापासून लागू राहतील.

८. हा शासन निर्णय नियोजन विभागाच्या दि. ०३.०८.२०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार गठित शासकीय प्रक्रिया पुनर्रचना (GPR) मान्यता समितीने दि. ०९.१०.२०२६ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६११०४१२३२४७४८१८ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHAILENDRA SAHEBRAO BORASE

Digitally signed by SHAILENDRA SAHEBRAO BORASE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Works Department, 2.5.4.20=6FC86C9CF78A99B4EB59DF32D1FA70B5D30EF3D6BA9BE2D6D9AF10F1268319B8, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4B90C6C84296B347D3553DCCEF07A19168E6BD51610DE7F6F3DB47C9CDFAAE5A, cn=SHAILENDRA SAHEBRAO BORASE
Date: 2026.11.04 12:33:50 +05'30'

(शैलेन्द्र बोरसे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. उप मुख्यमंत्री (रा.उ.शु.) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
६. मुख्य आयुक्त, राज्य सेवा हक्क आयोग, नवीन प्रशासन भवन, ७ वा मजला, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव , वित्त विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८. अपर मुख्य सचिव , नियोजन विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
९. सचिव , इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुध्दीमत्ता विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०. अपर मुख्य सचिव ,सार्वजनिक बांधकाम विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
११. आयुक्त, राज्य लोकसेवा हक्क, नाशिक विभाग, नाशिक.
१२. सचिव (इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग), मंत्रालय, मुंबई.
१३. सचिव (रस्ते),सार्वजनिक बांधकाम विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१४.सचिव (बांधकामे),सार्वजनिक बांधकाम विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१५. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे/नागपूर/मुंबई/नाशिक/छत्रपती संभाजीनगर /नांदेड/कोकण/अमरावती.
१६. व्यवस्थापकीय संचालक, MahaIT, मुंबई.
१७. निवड नस्ती (संगणक कक्ष) सार्वजनिक बांधकाम विभाग.

शासन निर्णय क्रमांक :- सीओएम-२०२४/प्र.क्र.२१/संगणक कक्ष, दिनांक ०४.११.२०२६- सोबतचे परिशिष्ट

परिशिष्ट-अ : शासन प्रक्रिया पुनर्रचना गोषवारा

S. N.	Service Name	No of Fields		No of Documents		No of Desks		RTS Timeline (Days)	
		Pre GPR	Post GPR	Pre GPR	Post GPR	Pre GPR	Post GPR	Pre GPR	Post GPR
1	Issuance of a no-objection certificate for road excavation for utility channels across or parallel to the road, as part of providing basic infrastructure services.	30	31	6	5	2	1	30	30
2	Issuing no objection certificate for approach road to petrol pump.	25	26	19	18	2	1	45	30
3	Issuing no objection certificate for building on roadside.	30	22	6	5	2	1	45	30

शासन निर्णय क्रमांक :- सीओएम-२०२४/प्र.क्र.२१/संगणक कक्ष, दिनांक ०४.११.२०२६- सोबतचे परिशिष्ट

परिशिष्ट-ब : अर्जातील भरावयाची माहीती

	Issuance of a no-objection certificate for road excavation for utility channels across or parallel to the road, as part of providing basic infrastructure services	**Issuing no objection certificate for approach road to petrol pump.**	**Issuance of NOC for construction of approach road for building on roadside.**
1	Firm Type	Firm Type	Firm Type
2	Name of Organisation	Name of Organisation	Name of Organisation
3	Permanent Address	Permanent Address	Permanent Address
4	City	City	City
5	District	District	District
6	Taluka	Taluka	Taluka
7	Pincode	Pincode	Pincode
8	Mobile Number	Mobile Number	Mobile Number
9	Latitude 1 & Longitude 1 of the Start Location Point	Latitude 1 & Longitude 1 of the Start Location Point	Latitude 1 & Longitude 1 of the Start Location Point
10	Latitude 2 & Longitude2 of the End Location Point	Latitude 2 & Longitude2 of the End Location Point	Latitude 2 & Longitude2 of the End Location Point
11	Contact Person Aadhar No. / MahaID No.	Contact Person Aadhar No. / MahaID No.	Contact Person Aadhar No. / MahaID No.
12	Contact Person Name	Contact Person Name	Contact Person Name
13	Contact Person Address	Contact Person Address	Contact Person Address
14	Contact Person Mobile No.	Contact Person Mobile No.	Contact Person Mobile No.
15	Name of Utility	Name of Utility	Name of Utility
16	Applied for District	Applied for District	Applied for District
17	Taluka	Taluka	Taluka
18	Name of Road	Name of Road	Name of Road
19	Email ID	Email ID	Email ID
20	Category of utility to be laid	Approach Road For	Category of utility to be laid
21	Is the utility to be taken along or across the road ?	Category of utility to be laid	Chainages and length in which the utility is to be taken along the road. Give further details of left hand side and/or right hand side

	Issuance of a no-objection certificate for road excavation for utility channels across or parallel to the road, as part of providing basic infrastructure services	**Issuing no objection certificate for approach road to petrol pump.**	**Issuance of NOC for construction of approach road for building on roadside.**
22	Chainages and length in which the utility is to be taken along the road. Give further details of left hand side and/or right hand side	Chainages and length in which the utility is to be taken along the road. Give further details of left hand side and/or right hand side	What will be the distance of utility from the center line of the nearest carriageway?
23	If the utility is crossing the road, the kilometer of the road at the crossing	LHS OR RHS of Road	
24	What is the depth at which utility is proposed to be laid ?	Name of Oil/Gas Company	
25	Is it proposed to lay utility across the road through casing Pipe?	Name of the Owner of Fuel Station	
26	If yes, what is the diameter, type of casing pipe and depth at which casing pipe is to be laid ?	Whether Fuel Station is part of Rest Area Complex	
27	Are the inspection chamber Proposed at the end of casing pipe ?		
28	If yes, location of the inspection Chamber from the centre of the carriageway and size of inspection chambers		
29	Is the utility maintenance free Or it requires maintenance annually or otherwise?		
30	What will be the distance of utility from the center line of the nearest carriageway?		
31	Do the agency prepared to restoration of road by themselves?		

शासन निर्णय क्रमांक :- सीओएम-२०२४/प्र.क्र.२१/संगणक कक्ष, दिनांक ०४.११.२०२६- सोबतचे परिशिष्ट

परिशिष्ट-क : आवश्यक कागदपत्रे

SN	Existing Document Name	Document Type
Issuance of a no-objection certificate for road excavation for utility channels across or parallel to the road, as part of providing basic infrastructure services		
1	Scan copy of Authorization Letter	Letter
2	Scan copy of Contact Person ID Proof	KYC
3	KMR/KMZ file	File
4	Please upload scan copy of Map showing alignment of utility to be laid	Map Location
5	Please upload any other required document (If Any - Optional)	
Issuing no objection certificate for approach road to petrol pump.		
1	Scan copy of Authorization Letter	Letter
2	Scan copy of Contact Person ID Proof	KYC
3	KMR/KMZ file	File
4	Please upload scan copy of Map showing alignment of utility to be laid	PDF,JPG,PNG,DOC,ZIP
5	Signed copy of License Deed	PDF,JPG,PNG,DOC,ZIP
6	Certified copy of location plan of the Fuel Station	PDF,JPG,PNG,DOC,ZIP
7	Certified copy of plan of the proposed Fuel Station	PDF,JPG,PNG,DOC,ZIP
8	Certified copy of sectional view showing elevation	PDF,JPG,PNG,DOC,ZIP
9	Drainage plan of the Fuel Station	PDF,JPG,PNG,DOC,ZIP
10	Detail of the material for pavement composition	PDF,JPG,PNG,DOC,ZIP
11	Undertaking from the Owner of Fuel Station would pay necessary fee for the use of the State Roads land	PDF,JPG,PNG,DOC,ZIP
12	Undertaking from the Fuel Station that necessary alteration including complete removal/shifting of the approach roads	PDF,JPG,PNG,DOC,ZIP
13	Undertaking from the Oil/Gas Company that they shall take all the action as prescribed in Appendix -1	PDF,JPG,PNG,DOC,ZIP
14	Undertaking from the Oil/Gas Company is not in operation	PDF,JPG,PNG,DOC,ZIP
15	Undertaking from the Oil/Gas Company that the fuel station is not energized by the Oil/Gas Company	PDF,JPG,PNG,DOC,ZIP
16	Documentary evidence of additional Land Acquisition details	PDF,JPG,PNG,DOC,ZIP
17	Duly signed Checklist as stipulated	PDF,JPG,PNG,DOC,ZIP

SN	Existing Document Name	Document Type
18	Please upload any other required document (If Any - Optional)	PDF,JPG,PNG,DOC,ZIP
Issuance of NOC for construction of approach road for building on roadside.		
1	Scan copy of Authorization Letter	Letter
2	Scan copy of Contact Person ID Proof	KYC
3	KMR/KMZ file	File
4	In case of Building Control Line permission, upload ownership documents like Village Map, Satbara, NA documents (If required)	PDF,JPG,PNG,DOC,ZIP
5	Please upload any other required document (If Any - Optional) Upload proposed layout map signed by competent authority, etc	PDF,JPG,PNG,DOC,ZIP